RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक ८९(३)] मंगळवार, ऑक्टोबर २८, २०२५/कार्तिक ६, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १९८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३३ब (१) नुसार ठाणे हायस्पीड रेल्वे स्थानक परिसरासाठी Local Area Plan तयार करण्याचा इरादा जाहिर करणेबाबत.**

क्रमांक ठामपा/मुख्या.१/शविवि.२९/वियोअंक/१९३२.— ज्याअर्थी, शासनाचे नगरविकास विभागामार्फत शासन निर्णय क्र. टीपीएस/१२९७/१३१९/ सीआर-१४८-९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर १९९९ अन्वये विकास योजनेच्या काही भागास मंजुरी देण्यात आली होती. तसेच विकास योजनेतील वगळलेल्या क्षेत्राकरिता (Excluded Part) शासन निर्णय क्र. टीपीएस. १२०१/२७४/ सीआर-२४/२००१/नवि-१२, दि. ३ एप्रिल २००३ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे व सदर विकास योजना दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेले) च्या कलम २६(१) मधील तरतुदीनुसार ठाणे शहराची प्रारूप सुधारीत विकास योजना (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) प्रसिद्ध केली आहे आणि त्याबाबतची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग-२ मध्ये दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारप विकास योजनेत, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ठाणे हायस्पीड रेल्वे (HSR) स्थानक परिसराच्या क्षेत्राचे सीमांकन 'HSR LAP Area' म्हणून करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी (JICA) च्या मार्गदर्शनाखाली ठाणे हायस्पीड रेल्वे (HSR) स्टेशन परिसरासाठी Local Area Plan तयार करण्याचे प्रस्तावित आहे; आणि JICA ने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन Local Area Plan च्या क्षेत्रामध्ये (यापुढे "उक्त ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन LAP क्षेत्र" असे निर्देशिलेले) ठाणे महानगरपालिका (मौजे दातीवली, म्हातार्डी, बेतावडे, आगासन या गावांचे भागशः क्षेत्र) तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (मौजे आयरे, कोपर, भोपर, नांदीवली तर्फ पंचानंद, काटई, उसरघर या गावांचे भागशः क्षेत्र) यांच्या हद्दीतील क्षेत्राचा समावेश आहे.

आणि ज्याअर्थी, महापालिका आयुक्त तथा प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी पत्र क्र. केडीएमसी/न.र.वि./३८००, दिनांक ७/११/२०२४ अन्वये उक्त ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन LAP क्षेत्राचे एकत्रित नियोजन ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यास सहमती दिली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने पत्र क्र. टीपीएस-१२२४/१३१३/ प्र.क्र.३/२५/नवि-१२, दि.०७/०१/२०२५ अन्वये उक्त ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन LAP क्षेत्रासाठी Local Area Plan तयार करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र अधिनियम क्र. ४४/२०२५) चे कलम ३३ब चे उपकलम (१) मधील तरतुदीनुसार उक्त ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन LAP क्षेत्रासाठी Local Area Plan तयार करण्याचा इरादा जाहिर करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका ठराव क्र. ३८६, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ अन्वये, उक्त अधिनियमाच्या कलम ३३ब (१) च्या तरतुदीनुसार उक्त ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन LAP क्षेत्रासाठी Local Area Plan तयार करण्याचा इरादा जाहिर करण्यास तसेच नागरीकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी मंजूरी दिलेली आहे.

त्याअर्थी, ठाणे महानगरपालिका, उक्त अधिनियमाच्या कलम ३३ब (१) च्या तरतुदीनुसार उक्त ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन LAP क्षेत्रासाठी Local Area Plan करीता नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. ठाणे हायस्पीड रेल्वे स्टेशन परिसरासाठीचे Local Area Plan मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनासाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत, खालील कार्यालयांमध्ये ठेवण्यात आलेला आहेः

१. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, दुसरा मजला, ठाणे महानगरपालिका मुख्य इमारत, सरसेनानी अरुण कुमार वैद्य मार्ग, पाचपाखाडी, ठाणे ४०० ६०२.

२. महापालिका आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, दुसरा मजला, कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्य इमारत, छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ, कल्याण, ठाणे ४२१ ३०१.

उक्त Local Area Plan च्या संदर्भात नागरिकांच्या काही सूचना/हरकती असल्यास, त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांच्या आत प्रशासक तथा आयुक्त, ठाणे महानगरपालिका, दुसरा मजला, ठाणे महानगरपालिका मुख्य इमारत, सरसेनानी अरुण कुमार वैद्य मार्ग, पाचपाखाडी, ठाणे ४०० ६०२ यांच्याकडे लेखी स्वरूपात कारणांसह सादर कराव्यात. सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांच्या आत ठाणे महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

**सौरभ राव,**
महापालिका आयुक्त तथा प्रशासक,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

दिनांक : २७ ऑक्टोबर २०२५.

## THANE MUNICIPAL CORPORATION, THANE

*NOTICE*

Declaration of Intention to Prepare Local Area Plan for Area Around Thane HSR Station Under Section 33B(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. TMC/HQ-1/TDD-29/DPIC/1932.— Whereas Development Plan of Thane Municipal Corporation was partially sanctioned by State Government under Urban Development Department's Resolution No. TPS.1297/1319/CR-148-97/UD-12, dated 4th October 1999 and rest of portion (Excluded Part) was sanctioned by State Government under Urban Development Department's resolution No.TPS.1201/274/CR-24/2001/UD-12, dated 3rd April, 2003 and such Development Plan came into force from date 14th May 2003;

And whereas, the Thane Municipal Corporation, (hereinafter referred to as "the said Planning Authority,") had published Draft Revised Development Plan of Thane Municipal Corporation (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, as per the provision of section 26(1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Act") and notice to that effect is published in *Maharashtra Government Gazette* extra-ordinary Part II on 11th October 2024;

And whereas, in the said Draft Development Plan, area around Thane High Speed Rail station within the jurisdiction of Thane Municipal Corporation is delineated as HSR LAP area.

And whereas, Local area plan for area around Thane HSR station is proposed to be prepared under guidance of Japan International Corporation Agency (JICA). And as per the guidelines prescribed by JICA, the delineated area of Thane HSR station Local area plan includes area within jurisdiction of Thane Municipal Corporation (including part area of Village Dativali, Mhatardi, Betawade, Agasan) and Kalyan Dombivali Municipal Corporation (including part area of Village Ayre, Kopar, Bhopar, Nandivali tarf Panchanand, Katai, Usarghar) (hereinafter referred to as "the said Thane HSR station LAP area").

And whereas, Municipal Commissioner and Administrator of Kalyan Dombivali Municipal Corporation *vide* letter No. KDMC/TPD/3800, dated 07/11/2024 has accorded their consent for unified planning of the said Thane HSR station LAP area by Thane Municipal Corporation.

And whereas, Urban Development Department of State government *vide* letter No. TPS-1224/1313/CR.3/25/UD-12, dated 07/01/2025 has appointed Thane Municipal Corporation for preparation of Local Area Plan for the said Thane HSR station LAP area.

And whereas, provision of sub-section (*1*) of section 33B of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XLIV of 2025) requires the declaration of its intention to prepare Local Area plan for the said Thane HSR station LAP area.

And whereas, the Thane Municipal Corporation has passed Resolution No. 386, dated 17th October 2025 to declare its intention to prepare Local Area Plan for the said Thane HSR station LAP area as per provision of section 33B (1) of the said Act, for inviting suggestions/objections from the public.

Therefore, Thane Municipal Corporation, as per provision of section 33B (1) of the said act, hereby declares intention for preparation of Local Area Plan for the said Thane HSR station area for inviting suggestions/objections from the public. The plan showing delineated boundary of the area included in Local Area Plan of area around Thane HSR station is kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Second Floor, Thane Municipal Corporation Main Building, General Arunkumar Vaidya Marg, Panchpakhadi, Thane 400 602.

2. Municipal Commissioner, Kalyan Dombivli Municipal Corporation, 2nd floor, Kalyan Dombivli Municipal Corporation Main Building, Near Chatrapati Shivaji Maharaj Chowk, Kalyan, District Thane 421 301.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to The Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane, within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Govt. Gazette*. Suggestions/objections received by the Thane Municipal Corporation, Thane within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

SAURABH RAO, IAS,
Municipal Commissioner & Administrator,
Thane Municipal Corporation, Thane.

Date :- 27th October 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.